Ministry of Cooperation | सहकारिता मंत्रालय
Government of India | भारत सरकार

# NCCT CO-OP NEWS BULLETIN

**Date: 1 0 .04.2024**

| Sr No | Date | Publication | Edition/Language | Page no. | Circulation |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 07-04-2024 | Sanj Samachar | Pune/Marathi | 7 | 38000 |
| 2. | 08-04-2024 | Sanjvarta | Pune/ Marathi | 4 | 52000 |
| 3. | 09-04-2024 | Hamara Mahanagar | Pune/ Hindi | 5 | 70000 |
| 4. | 10-04-2024 | RAshtra Sanchar | Pune/ Marathi | 9 | 70000 |

| | | | |
|---|---|---|---|
| Publication: | Sanj Samachar, Pg 7 | Edition: Pune | Print |
| Published Date: | April 7, 2024 | | |

VAMNICOM provides training to over 6,150 in cooperatives across Maharashtra

# व्हॅम्निकॉमकडून संपूर्ण महाराष्ट्रातील ६१५० पेक्षा अधिक सहकारी संस्थांना दिले प्रशिक्षण

पुणे, : सहकारी संस्था प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय परिषद (एनसीसीटी) या संस्थेच्या अंतर्गत येणारी राष्ट्रीय संस्था असलेल्या व्हॅम्निकॉमने २०२३ –२४ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील सहकारी संस्थांशी संबंधित ६१५६ व्यक्तींना प्रशिक्षण दिले आहे. यांमध्ये १०१८ महिलांचा समावेश आहे.

| Publication: | Sanjvarta, Pg 4 | Edition: Pune | Print |
|---|---|---|---|
| Published Date: | April 7, 2024 | | |

VAMNICOM provides training to over 6,150 in cooperatives across Maharashtra

# व्हॅम्निकॉमकडून महाराष्ट्रातील ६१५० पेक्षा अधिक सहकारी संस्थांना दिले प्रशिक्षण

**पुणे :** सहकारी संस्था प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय परिषद (एनसीसीटी) या संस्थेच्या अंतर्गत येणारी राष्ट्रीय संस्था असलेल्या व्हॅम्निकॉमने २०२३ -२४ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील सहकारी संस्थांशी संबंधित ६१५६ व्यक्तींना प्रशिक्षण दिले आहे. यांमध्ये १०१८ महिलांचा समावेश आहे.

सहकार मंत्रालयाच्या उपक्रमांना अनुसरून पुण्याच्या व्हॅम्निकॉमने २०२३-२४ मध्ये व्यापक संपर्क कार्यक्रम हाती घेतला. या अंतर्गत प्रमुख भागधारकांना सामील करून घेत संपूर्ण देशभरात कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच महिला व दुर्बल घटकांसहित समाजाच्या सर्व वर्गांना समाविष्ट करून घेण्यात आले.

एनसीसीटी ही सहकार मंत्रालयाने प्रवर्तित केलेली एक स्वायत्त संस्था आहे. व्हॅम्निकॉमने (वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था) १५ राज्यांमध्ये विविध कार्यक्रम घेतले. यात एकूण १०५८३ व्यक्ती सहभागी झाल्या, त्यांपैकी ४० टक्के महिला होत्या. त्यांना सहकार मंत्रालयाच्या विविध उपक्रमांबाबत प्रशिक्षण पुरविण्यात आले. प्रशिक्षण प्राप्त करणाऱ्या सहभागीशु व्यक्तींची सर्वाधिक संख्या महाराष्ट्रात होती. त्या खालोखाल गुजरात, केरळ, झारखंड, कर्नाटक, तेलंगाना, जम्मू-काश्मीर, पश्चिम बंगाल, हरियाणा, छत्तीसगड, आसाम, ओडिशा, राजस्थान, बिहार आणि तमिळनाडू यांचा क्रमांक होता.

भारतातील सहकारी संस्थांचे उन्नयन' यावर व्हॅम्निकॉमने प्रकाशित केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. महाराष्ट्रात व्हॅम्निकॉमच्या संपर्क कार्यक्रमांत एकूण ६,१५६ व्यक्ती सहभागी झाल्या. यांमध्ये १०१८ महिला आणि ५१३८ पुरुष होते अहवालात दिलेल्या माहितीप्रमाणे, या ५१३८ पुरुषांपैकी ६९ टक्के खुल्या वर्गातील तर १९ टक्के अन्य मागासवर्गीयांमधील होते. अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक आणि भटक्या विमुक्त जमातींमधील अगदी थोडे जण यात सहभ ागी झाले असून त्यांची टक्केवारी अनुक्रमे ७ टक्के, ३ टक्के आणि २ टक्के होती.

महाराष्ट्रातील संचालक मंडळ, व्यवस्थापन, शेतकरी सभासद तसेच सहकारी संस्थांमधील अन्य भागधारकांसाठी क्षमता निर्मिती कार्यक्रम घेण्यात आले. या अहवालात म्हटले आहे, सहकारी संस्थांना बळकट करण्यासाठी सहकार मंत्रालयाने राबविलेल्या नवीन उपक्रम ंबाबत जनजागृती पसरविण्याचे कार्य या कार्यक्रमांनी केले.व्हॅम्निकॉम च्या कार्यक्रमांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रांमध्ये कृषी, विपणन, पतसंस्था व बँकिंग, मत्स्यपालन आणि प्राथमिक कृषी पतसंस्था (पीएसीएस) यांचा समावेश होता.जम्मू कश्मीर, राजस्थान, हरियाणा, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडु, तेलंगाणा, छत्तीसगड, ओडिशा, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल आणि आसाम या १५ राज्यांमध्ये व्हॅम्निकॉम चा संपर्क कार्यक्रम राबविण्यात आला. व्हॅम्निकॉमची स्थापना १९४८ साली मुंबईत झाली व नंतर तिचे स्थलांतर पुण्याला झाले. कल्याणकारी राज्याच्या प्रसारासाठी सहकारी संस्थांचे महत्त्व ओळखून सहकारातून समृद्धी हे स्वप्न साकार करण्यासाठी भारत सरकारने ६ जुलाई २०२१ रोजी स्वतंत्र सहकार मंत्रालयाची निर्मिती केली.सहकार मंत्रालयाची स्थापना झाल्यानंतर या मंत्रालयाने अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये सहकाराचा लाभ मिळवून देण्यासाठी असंख्य उपक्रम राबविले आहेत.

| Publication: | Hamara Mahanagar, Pg 5 | Edition: | Print |
|---|---|---|---|
| Published Date: | April 9, 2024 | | |

# 6,150 से अधिक लोगों को वैमनिकॉम द्वारा प्रशिक्षित किया गया

**महानगर नेटवर्क**

**पुणे**

वित्तीय वर्ष 2023-24 के दौरान महाराष्ट्र में राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषद (एनसीसीटी) के तत्वावधान में एक राष्ट्रीय संस्थान वैमनीकॉम द्वारा आयोजित विभिन्न प्रशिक्षणों में सहकारी समितियों से संबंधित 1,018 महिलाओं सहित 6,156 लोगों ने भाग लिया।सहकारिता मंत्रालय की पहल के अनुरूप, वैमनीकॉम, पुणे ने 2023-24 के दौरान देश भर में एक प्रमुख आउटरीच कार्यक्रम चलाया, जिसमें विभिन्न सहकारी समितियों के प्रमुख हितधारकों और महिलाओं और कमजोर वर्गों सहित समाज के सभी वर्गों को शामिल किया गया। वैमनीकॉम (वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्थान) ने 15 राज्यों में आयोजित विभिन्न जागरूकता कार्यक्रमों के माध्यम से, कुल 10,583 प्रतिभागियों को प्रशिक्षित किया, जिनमें से लगभग 40 प्रतिशत महिलाएं थीं। वैमनीकॉम की रिपोर्ट 'भारत में सहकारी समितियों का विस्तार' में कहा गया है कि सबसे अधिक प्रतिभागियों को महाराष्ट्र राज्य में प्रशिक्षित किया गया, इसके बाद गुजरात, केरल, झारखंड, कर्नाटक, तेलंगाना, जम्मू और कश्मीर, पश्चिम बंगाल, हरियाणा, छत्तीसगढ़, असम, ओडिशा, राजस्थान, बिहार और तमिलनाडु हैं। महाराष्ट्र में, वैमनीकॉम आउटरीच कार्यक्रमों ने कुल 6,156 लोगों को कवर किया। इस संख्या में 1,018 महिलाएं और 5,138 पुरुष शामिल थे। रिपोर्ट के अनुसार, "5,138 पुरुषों में से 69 प्रतिशत सामान्य श्रेणी से थे, 19 प्रतिशत ओबीसी थे और एसटी, अल्पसंख्यक और एनटी श्रेणियों से क्रमश, 7 प्रतिशत, 3 प्रतिशत और 2 प्रतिशत थे। महाराष्ट्र में निदेशक मंडल, प्रबंधन, किसान सदस्यों के साथ-साथ सहकारी समितियों के अन्य हितधारकों के लिए क्षमता निर्माण कार्यक्रम आयोजित किए गए।रिपोर्ट में कहा गया है कि "इन कार्यक्रमों ने सहकारी समितियों को मजबूत करने के लिए सहकारिता मंत्रालय द्वारा की गई नई पहलों के बारे में जागरूकता फैलाने का काम किया।"

| Publication: | Rashtrasanchar, Pg 9 | Edition: | Print |
|---|---|---|---|
| Published Date: | April 10, 2024 | | |

VAMNICOM provides training to over 6,150 in cooperatives across Maharashtra

# महाराष्ट्रातील ६१५० पेक्षा अधिक सहकारी संस्थांना प्रशिक्षण


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे** : सहकारी संस्था प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय परिषद (एनसीसीटी) या संस्थेच्या अंतर्गत येणारी राष्ट्रीय संस्था असलेल्या व्हॅम्निकॉमने २०२३-२४ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील सहकारी संस्थांशी संबंधित ६१५६ व्यक्तींना प्रशिक्षण दिले आहे. यांमध्ये १०१८ महिलांचा समावेश आहे.

सहकार मंत्रालयाच्या उपक्रमांना अनुसरून पुण्याच्या व्हॅम्निकॉमने २०२३-२४ मध्ये व्यापक संपर्क कार्यक्रम हाती घेतला. या अंतर्गत प्रमुख भागधारकांना सामील करून घेत संपूर्ण देशभरात कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच महिला व दुर्बल घटकांसहित समाजाच्या सर्व वर्गांना समाविष्ट करून घेण्यात आले.

एनसीसीटी ही सहकार मंत्रालयाने प्रवर्तित केलेली एक स्वायत्त संस्था आहे. व्हॅम्निकॉमने (वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था) १५ राज्यांमध्ये विविध कार्यक्रम घेतले. यात एकूण १०५८३ व्यक्ती सहभागी झाल्या, त्यांपैकी ४० टक्के महिला होत्या. त्यांना सहकार मंत्रालयाच्या विविध उपक्रमांबाबत प्रशिक्षण पुरविण्यात आले. प्रशिक्षण प्राप्त करणाऱ्या सहभागी व्यक्तींची सर्वाधिक संख्या महाराष्ट्रात होती. त्या खालोखाल गुजरात, केरळ, झारखंड, कर्नाटक, तेलंगाना, जम्मू-काश्मीर, पश्चिम बंगाल, हरियाणा, छत्तीसगड, आसाम, ओडिशा, राजस्थान, बिहार आणि तमिळनाडू यांचा क्रमांक होता. भारतातील सहकारी संस्थांचे उन्नयन' यावर व्हॅम्निकॉमने प्रकाशित केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. महाराष्ट्रात व्हॅम्निकॉमच्या संपर्क कार्यक्रमांत एकूण 6,156 व्यक्ती सहभागी झाल्या. यांमध्ये १०१८ महिला आणि ५१३८ पुरुष होते. अहवालात दिलेल्या माहितीप्रमाणे, "या ५१३८ पुरुषांपैकी ६९ टक्के खुल्या वर्गातील तर १९ टक्के अन्य मागासवर्गीयांमधील होते. अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक आणि भटक्या विमुक्त जमातींमधील अगदी थोडे जण यात सहभागी झाले असून त्यांची टक्केवारी अनुक्रमे ७ टक्के, ३ टक्के आणि २ टक्के होती." महाराष्ट्रातील संचालक मंडळ, व्यवस्थापन, शेतकरी सभासद तसेच सहकारी संस्थांमधील अन्य भागधारकांसाठी क्षमता निर्मिती कार्यक्रम घेण्यात आले. या अहवालात म्हटले आहे, "सहकारी संस्थांना बळकट करण्यासाठी सहकार मंत्रालयाने राबविलेल्या नवीन उपक्रमांबाबत जनजागृती पसरविण्याचे कार्य या कार्यक्रमांनी केले." व्हॅम्निकॉमच्या कार्यक्रमांमध्ये क्षेत्रांमध्ये कृषी, विपणन, पतसंस्था, बँकिंग, मत्स्यपालन , प्राथमिक कृषी पतसंस्था (पीएसीएस) यांचा समावेश होता.

# LOCATIONS OF NCCT INSTITUTES




## NATIONAL COUNCIL FOR COOPERATIVE TRAINING

(AN AUTONOMOUS SOCIETY PROMOTED BY MINISTRY OF COOPERATION, GOVERNMENT OF INDIA)

3, Siri Institutional Area (3rd Floor), August Kranti Marg, New Delhi-110016

011-41096510 secy-ncct@gov.in www.ncct.ac.in